**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भिमराव लक्ष्मण (सुरेश) पवार
आंधळगाव, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
पंढरपूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
पंढरपूर, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.रविंद्र बाजीराव कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.शामराव चंदू गस्ते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी मागितलेली संपूर्ण माहिती देऊन पोहोच घेतली आहे. आपले समाधान झाले असून अर्ज निकाली काढावा, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.भिमराव लक्ष्मण (सुरेश) पवार यांनी दि.२७.१.२०१० च्या पत्रान्वये दिले आहे. याच मूळ अर्जाचा अपील क्र.८२१ मध्ये राज्य माहिती आयोगाने निर्णय दिला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.शामराव चंदू गस्ते यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दादाभाऊ अभा शिंदे
मु.वैदूवाडी, नारायणगांव,
ता.जुन्नर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
भूमि अभिलेख कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमि अभिलेख कार्यालय जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९१/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३/०७/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**<br>भूमि अभिलेख कार्यालय जुन्नर,<br>ता.जुन्नर, जि.पुणे<br>श्री.सूर्यभान गायकवाड<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**<br>भूमि अभिलेख कार्यालय,<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१<br>श्री.बाळासाहेब वानखेडे | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा तपशील, त्यांना नेमून दिलेली कामे, जानेवारी ते मार्च २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यविवरण नोंदवहीच्या व या कालावधीत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या छायाप्रती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दादाभाऊ अभा शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१३/७/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे मुदतीत माहिती दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, पुणे यांनी सुनावणीच्या वेळी पूरक कागदपत्रांसह, तसेच अपीलकर्त्याच्या पोहोचेसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय बाबुराव कदम
मु.पो.मोडनिंब, ता.माढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय बाबुराव कदम<br>मु.पो.मोडनिंब, ता.माढा, जि.सोलापूर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.३.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

सन १९६६ ते १९८० या काळातील एका प्राथमिक शिक्षकाबद्दलची माहिती आपण मागितली होती. ग्रॅच्युईटी, प्रॉव्हिडंट फंड व पेन्शन मिळण्याची मागणी आहे. त्यानुसार कार्यवाही केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय बाबुराव कदम यांनी केली.

अपीलकर्त्यांनी दारिद्र्यरेषेखाली असल्याचे नमूद केले असून त्यांचा अर्ज गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट यांच्या कक्षेत येत असल्यामुळे तिकडे वर्ग केला व त्यांनी श्री.कदम यांना 'संबंधित शिक्षकाबाबतचा नेमका तपशील दिलेला नाही. तसेच नेमक्या माहितीची मागणी केलेली नाही,' असे कळविले. नेमकी माहिती मागितल्यास देता येईल, असेही गटशिक्षण अधिकाऱ्यांनी पत्रात नमूद केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.टी.एच.घाडगे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. ग्रॅच्युइटी आदी मिळण्याबाबतची अपीलकर्ता यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. अपीलकर्त्यांनी नेमकेपणाने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हिरासिंग ठाकूरसिंग बाडीवाले
प्लॉट नं.७०, म्हेत्रेनगर, कुमठा नाका, वीटभट्टीजवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हिरासिंग ठाकूरसिंग बाडीवाले
प्लॉट नं.७०, म्हेत्रेनगर, कुमठा नाका, वीटभट्टीजवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.एल.चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.एस.एल.चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.४.२०१० रोजी घेण्यात आली.

किरकोळ व घाऊक रॉकेल विक्रेत्यांकडून होत असलेल्या गैरव्यवहारांबाबत आपण वेळोवेळी तक्रार व आंदोलन करून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत मागणी केली होती. त्या वसुलीच्या चलनांच्या प्रती दिशाभूल करणाऱ्या दिल्या. आपण मागणी केली नसती, तर दंड केला नसता. या व्यवहारात मोठा भ्रष्टाचार असून त्याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.हिरासिंग ठाकूरसिंग बाडीवाले यांनी केली. तसेच नमूद केलेल्या पृष्ठसंख्येपेक्षा कमी पाने आपल्याला दिल्याची तक्रारही त्यांनी केली.

श्री.बाडीवाले यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असून मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित परवानाधारक व कर्मचारी यांच्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही चालू होती. त्याविरूध्द त्यांनी उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. या बाबींमुळे कायदेशीर बाबींची योग्य ती दखल घेऊन माहिती दिली. विलंब झाल्यामुळे सर्व माहिती निःशुल्क व घरपोच दिली. आणखी कोणतीही माहिती वा अभिलेखाचे अवलोकन आवश्यक असल्यास त्यांना उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.एस.एस.चव्हाण यांनी केले. ते रास्त आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.सत्यभामा नारायण कारंडे
मु.पो.एखतपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत एखतपूर,
ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.सत्यभामा नारायण कारंडे
मु.पो.एखतपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.एस.आर.पवार

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत एखतपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर विद्यमान श्रीके.डी.कदम, तत्कालीन श्री.एम.डी.म्हेत्रे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

विविध योजनांखाली एखतपूर ग्रामपंचायतीने सन १९९८ पासून केलेल्या कामांची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत एखतपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यांनी ती विहित मुदतीत दिली नाही. माहिती घेऊन ग्रामपंचायतीचा शिपाई समक्ष आला होता. परंतु टपालाने माहिती पाठविण्यास आपण सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता सौ.सत्यभामा नारायण कारंडे यांनी केले.

सौ.कारंडे यांनी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. संपूर्ण माहिती उपलब्ध असून पंचायतीकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे अभिलेखांचे अवलोकन करावे, असे आपण रजिस्टर्ड टपालाने मुदतीत कळविले व समक्ष भेटीतही सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यांच्या आदेशानंतर

शिपाई पाठविला असता सौ.कारंडे यांनी माहिती स्वीकारली नाही. अशा प्रकारे माहिती न स्वीकारता वेगवेगळ्या कार्यालयांकडे त्या तक्रारी करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत एखतपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.के.डी.कदम यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केली आहे. अपीलकर्त्यांना माहिती आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून आवश्यक प्रतींची लेखी मागणी करून माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शिवाजी हणमंत सुगरे
सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर .. **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर .. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१२ /सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,<br>विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर श्रीमती रागिणी बाजीराव ढमाळ | |
| ४ | मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीची छायांकित प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर

यांनी संगनमताने जाणीवपूर्वक अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केली आहे.

संस्थावाद न्यायालयात चालू असून त्या अनुषंगाने सातत्याने माहिती-मागणीचे अर्ज करुन अपीलकर्ता त्रास देत आहेत. आतापर्यंत त्यांनी अन्य पत्रव्यवहाराव्यतिरिक्त ७६ अर्ज केले असून त्या त्या वेळी त्यांना उत्तरे दिली आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर श्रीमती रागिणी बाजीराव ढमाळ यांनी केले.

एकाच संस्थेकडे विशिष्ट कारणासाठी अपीलकर्ता श्री. सुगरे वारंवार अर्ज व अपिले करीत असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर यांनी केले.

श्री. सुगरे यांनी केलेले अर्ज व त्यावरील कार्यवाही याबाबतचा अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार ४४९ पानांचा तपशीलवार अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर श्रीमती रागिणी बाजीराव ढमाळ यांनी सादर केला. तो लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर कायद्याच्या मूळ उद्दिष्टांशी सुसंगत असा करावा, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. 31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सिद्राम विठ्ठलराव बंडा
लक्ष्मी नरसिंह मंदिराशेजारी, अशोक चौक, सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड,
पहिला मजला, उत्तर सदर बझार, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष / सचिव, श्री कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्था,
१९६, गुरुवार पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |
| ३. | उपस्थित<br>**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष / सचिव, श्री कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्था, १९६, गुरुवार पेठ, सोलापूर तत्कालीन श्री.व्ही.आर.बिराजदार | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.२.२००९ व ५.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी दि.२७.२.२००९ रोजी कोणीही

उपस्थित न राहिल्यामुळे, दि.५.५.२००९ रोजी पुन्हा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश केला होता. यावेळी फक्त अपीलकर्ता उपस्थित राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.सिद्राम विठ्ठलराव बंडा यांनी श्री कुरूहिनशेट्टी ज्ञाती संस्था, १९६, गुरूवार पेठ, सोलापूर या संस्थेच्या संदर्भातील माहिती मागितली होती. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, तसेच अपीलकर्त्यांनी गृहितावर आधारित माहिती, भाष्य व खुलासे अशा स्वरूपाची विचारणा अनेक मुद्दयांमध्ये केली आहे. दि.१९.११.२००९ पासून सहधर्मादाय आयुक्त, लातूर यांनी संस्थेचे विश्वस्त मंडळ बरखास्त करून शाळेवर प्रशासकाची नेमणूक केली आहे, असे लेखी व तोंडी निवेदन संस्थेचे तत्कालीन प्रतिनिधी श्री.व्ही.आर.बिराजदार यांनी केले. ते लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जिनकर भागवत माळी
विभागीय कृषी संशोधन केंद्र, कृषक भवन,
९७, रविवार पेठ, दयानंद महाविद्यालयशेजारी, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), साखर संकुल इमारत, शिवाजीनगर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), साखर संकुल इमारत, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जिनकर भागवत माळी
विभागीय कृषी संशोधन केंद्र, कृषक भवन,
९७, रविवार पेठ, दयानंद महाविद्यालयशेजारी, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), साखर संकुल इमारत, शिवाजीनगर, पुणे श्री.आनंद अ.कटके

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(४), साखर संकुल इमारत, शिवाजीनगर, पुणे श्री.कैलास प्र.जेबले

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झालेली नसताना झाली असल्याचे कळविले. सभासदांच्या भूखंडाचे क्षेत्र कमी करण्यात आले असून, संबंधित प्रकरणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. संस्थेबाबतची खरी माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.जिनकर भागवत माळी यांनी केले.

अपीलकर्ता यांच्या अर्जात नेमकेपणाने माहितीची मागणी केलेली नाही. तसेच ज्या संस्थेची माहिती त्यांना हवी आहे, ती संस्था नोंदणी झालेली नाही व कागदपत्रे तीन वर्षांची असून, ड वर्गातील असल्यामुळे उपलब्ध होत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे(४), साखर संकुल इमारत, शिवाजीनगर, पुणे श्री.कैलास प्र.जेबले यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामगोपाळ गणपती लकेरी
'सौदामिनी निवास', स्वामी विवेकानंद नगर, **अपीलकर्ता**
सर्व्हे नं.१२५, वाल्हेकरवाडी रोड,
मौजे चिंचवड, ता.हवेली,
पुणे-३३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी अधीक्षक,**
भूमि अभिलेख,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,**
पिंपरी चिंचवड कार्यालय,
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४७/२००९/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.रामगोपाळ गणपती लकेरी यांना त्यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. 'दरम्यानच्या काळात प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांच्याकडून मला योग्य ती माहिती पुरविली गेली असून त्याबाबत माझी काहीही तक्रार नाही. माझे अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.लकेरी यांनी दि.२३/७/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.

दि :- 26 JUL 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कल्याण सोपानराव सोनवणे
एन-११, के४०/४, नवजीवन कॉलनी, **अपीलकर्ता**
हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७/७/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.कल्याण सोपानराव सोनवणे<br>एन-११, के४०/४, नवजीवन कॉलनी,<br>हडको, औरंगाबाद<br><br>**जन माहिती अधिकारी,**<br>अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>सर्वश्री. एन.व्ही .पावरा, एम.डी.काटवटे, बी.एस.अहिरे व रामदास म्हात्रे | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**<br>अपंग कल्याण आयुक्तालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे<br>श्री.हंबिरराव कांबळे |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००९ साली अपंग कल्याण आयुक्तालयास राज्यातून अनुदानासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या सत्यप्रती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कल्याण सोपानराव सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२७/७/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'माझ्या मूळ अर्जाप्रमाणे मला माहिती प्राप्त करुन देण्यात आलेली आहे. माझे समाधान झालेले असून माझी माहितीबाबत तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री. सोनवणे यांचे दि.१७/३/२०१०चे निवेदन जन माहिती अधिकारी, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आयोगास सादर केले. तसेच 'माहिती मिळालेली आहे. माझे काहीही म्हणणे नाही', असे अपीलकर्त्यांनी सुनावणीच्या वेळीही लेखी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 29 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महादेव बाजीराव साकोरे
संस्थापक संपादक साप्ताहिक कान्होराज,
केंदुर, ता. शिरुर, जि. पुणे .. **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरुर
ता. शिरुर, जि. पुणे .. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर
तहसील कार्यालय शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २७.७.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. महादेव बाजीराव साकोरे<br>संस्थापक संपादक साप्ताहिक कान्होराज,<br>केंदुर, ता. शिरुर, जि. पुणे | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

तहसील कार्यालयाच्या द्वारापाशी बेकायदेशीरपणे मुद्रांक विक्री व अन्य कामे करणा-यांची अन्य माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर यांनी चुकीची व दिशाभूल करणारी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. महादेव बाजीराव साकोरे यांनी केली.

ग्रामपंचायत निवडणुकीच्या मतदानविषयक कामामुळे सुनावणीला उपस्थित न राहण्याची परवानगी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरुर यांनी घेतली होती.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरुर यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत समाविष्ट होणारी माहिती मागितली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दामोदर ईश्वर सावंजी
मु.पो.मंगळवेढा, खंडोबा गल्ली, जि. सोलापूर .. **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी
पुणे, जि. पुणे .. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण
अधिकारी, सोलापूर जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर जि. सोलापूर श्रीमती मनिषा फुले | |
| ४ | मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीची छायांकित प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण दि. ६.८.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी अद्यापपर्यंत दिलेली नाही. त्यामुळे त्यांना शास्ती करावी व संपूर्ण माहिती नि:शुल्क द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दामोदर ईश्वर सावंजी यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

श्री. सावंजी यांचा अर्ज दि. ७.८.२००८ रोजी प्राप्त झाला. अभिलेख कक्षातील विस्तृत माहिती शोधून माहिती देण्यास विलंब झाला. दि. १८.२.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर श्रीमती मनिषा फुले यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री. सावंजी यांचा अर्ज दि.७.८.२००८ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी विहित मुदतीत कोणतेही उत्तर दिलेले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांनी दि.६.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर यांना सूचना दिल्या. तसेच दि.३१.१.२००९ च्या पत्रान्वये पुन्हा स्मरण देऊन माहिती न देण्याबाबतचा खुलासा मागविला. त्यानंतर दि. २७.२.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी त्यासोबत आयोगाला सादर केलेल्या पत्रात दि.२०.२.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे म्हटले आहे. या सर्व बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी यांनी मुदतीत व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कलयाण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांच्या सूचनेनंतरही माहिती देण्याबाबत तत्परतेने कार्यवाही केलेली नाही. विलंबाबाबतचा खुलासा व शास्तीबाबतचे म्हणणे जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर श्रीमती मनिषा फुले यांनी यानी तीन दिवसांत आयोगाला सादर करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. २४.५.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी श्रीमती मनिषा फुले यांनी खुलासा सादर केला. मागितलेल्या माहितीची नस्ती जुन्या कालावधीतील (मार्च व सप्टेंबर २००७) असल्याने रेकॉर्डरुम मध्ये ठेवण्यात आली होती. रेकॉर्डरुम अत्यंत लहान असून सर्व विभागांचे अभिलेख एकत्रित असल्यामुळे व अभिलेखपालाचे पद कार्यालयात नसल्यामुळे व्यापक स्वरुपाचे दैनंदिन कामकाज संभाळून अभिलेख शोधण्यास विलंब झाला. कर्मचारी वर्ग अपुरा आहे, व कामाचे प्रमाण मोठे आहे, त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे या खुलाशात जन माहिती अधिकारी, श्रीमती मनिषा फुले यांनी विस्ताराने तपशीलवर नमूद केले आहे. तथापि हा खुलासा लक्षात घेऊनही

विलंबाचा संपूर्ण कालावधी क्षमापित करण्यास पात्र ठरत नाही. माहिती दि.१८.२.२००९ रोजी दिली, असे मान्य केले तरी एकूण १३८ दिवस विलंब झाला आहे. खुलाशात नमूद केलेल्या सर्व कारणांचा विचार करुन त्यातील निम्मा कालावधी क्षमापित करण्यात येत असून ऊर्वरित ६९ दिवसांसाठी जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर श्रीमती मनिषा फुले या शास्तीस पात्र धरण्यात येत आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर श्रीमती मनिषा फुले यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसल्याने त्यांना ६९ दिवसांची (६९ x २५०) १७,२५०/- रुपये शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती त्यांच्या ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर २०१० च्या व सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून वसूल करावी. ही रक्कम '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे, जि. पुणे यांनी करावी व त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. 31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय महादेवराव सोनवणे
रायगड, राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, जि.धाराशीव — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर प्रतिनिधी श्रीमती मंजुषा रामचंद्र मिसकर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती मंजुषा रामचंद्र मिसकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी आपल्या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज केलेला नाही. गॅस पुरवठा सुरळीत होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी त्यांनी दि.१५.११.२००७ च्या साध्या अर्जान्वये शासनाकडे केली होती. पुढील कार्यवाहीसाठी हा अर्ज या कार्यालयाकडे पाठविल्याचे शासनाने पत्रात नमूद केले, परंतु अर्ज प्राप्त झालेला नाही. तसेच त्यांना निश्चित कोणती माहिती पाहिजे आहे, याबाबत लेखी व तोंडी संपर्क साधूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत त्यांनी नेमकेपणाने कळविल्यास त्यांना माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती मंजुषा रामचंद्र मिसकर यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भरत बजरंग बल्लाळ
संजीवनी प्लाझा, फ्लॅट नं.४,
डावी भुसारी कॉलनी, कोथरुड
पुणे-२९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण संचालक,**
उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१५/२००९/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. भरत बजरंग बल्लाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन श्री.बल्लाळ यांनी मागणी केलेली माहिती ही खुलासे व भाष्य,

अन्वयार्थ याची मागणी करणारी आहे. सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 JUL 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धनंजय कृष्णाजी चव्हाण
मु.पो.उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, उंदरगाव विविध कार्यकारी सेवा
सहकारी संस्था मर्यादित,उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२१+१३२२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धनंजय कृष्णाजी चव्हाण
मु.पो.उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.संजय पोपटराव जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था
मर्यादित,उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर श्री.ज्ञानदेव एकनाथ पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

उंदरगाव विविध कार्यकारी सेवा संस्था सोसायटीकडे किर्दी, खतावण्या इ. प्रतींची मागणी आपण केली होती. परंतु संस्थेचे पूर्वीचे सचिव श्री.दत्तात्रय नारायण थोरात यांना कामावरून कमी करण्यात आले असून पूर्वीच्या किर्दी, खतावण्या त्यांनी नष्ट केल्यामुळे माहिती मिळत नाही. त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.धनंजय कृष्णाजी चव्हाण यांनी केली.

अपीलकर्ता यांचे अपील मान्य करून माहिती देण्याबाबतचे कारवाईच्या जाणीवेसह आदेश जन माहिती अधिकारी तथा सचिव, उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित,उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर यांना आपण दिले, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.संजय पोपटराव जाधव यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित,उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर श्री.दत्तात्रय नारायण थोरात यांनी संस्थेचे दप्तर नाश केल्याने माहिती देता येत नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित,उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर श्री.ज्ञानदेव एकनाथ पवार यांनी केले.

आपल्याला दि.८.२.२००९ पासून कामावरून कमी करण्यात आले असून श्री.भाऊसाहेब वारगळ यांनी नंतर पदभार स्वीकारला. आपल्याकडे माहिती नसल्यामुळे देता येत नाही, असे लेखी निवेदन श्री.थोरात यांनी दि.३०.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता, माहिती न देण्यास विद्यमान सचिवांना जबाबदार धरता येणार नाही. तत्कालीन सचिव श्री.थोरात यांनी कागदपत्रे नष्ट केली का, हा व अनुषंगिक बाबी फौजदारी गुन्हा नोंदवून चौकशीच्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ही बाब येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांनी उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थेची अपीलकर्त्यांनी मागितलेली कागदपत्रे उपलब्ध नसण्याबाबत चौकशी करून दि.३०.८.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010